# फिरोदिया करंडक स्पर्धेत पारितोषिक



*फिरोदिया करंडक स्पर्धेत टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या संघाची प्रभावी छाप*

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीला वाव देणाऱ्या आणि अत्यंत प्रतिष्ठेच्या फिरोदिया करंडक स्पर्धेच्या अंतिम फेरीत टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या संघाने ‘दास्तान-एक जहान’ या प्रेमकथेच्या

प्रभावी सादरीकरणातून प्रेक्षकांची मने जिंकली. त्यांच्या उत्कृष्ठ सादरीकरणामुळे त्यांना सांघिक तृतीय पारितोषिक मिळाले सोशियो इकॉनॉमिक डेव्हलपमेंट ट्रस्ट, स्वप्नभूमी आणि एचसीएल फाउंडेशन व पुनीत बालन ग्रुपतर्फे आयोजित या स्पर्धेची अंतिम फेरी 22 व 23 फेब्रुवारी 2025 रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रेक्षागृह, पद्मावती येथे पार पडली.

प्राथमिक फेरींमधून निवड झालेल्या 9 संघांनी अंतिम फेरीत उत्कृष्ट सादरीकरण करत चुरशीची स्पर्धा निर्माण केली. यामध्ये सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे यांनी प्रथम क्रमांक पटकावत फिरोदिया करंडकावर आपले नाव कोरले. एमआयटी अकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग, आळंदी यांनी द्वितीय क्रमांक पटकावला, तर टिळक महाराष्ट्र विद्यापीठ आणि गरवारे वाणिज्य महाविद्यालय यांनी तृतीय क्रमांक विभागून मिळवला

*संघाचे विशेष कौतुक*

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या संघाने ‘दास्तान-एक जहान’ या नाटकाच्या माध्यमातून एक प्रभावी प्रेमकथा सादर केली. अभिनय, नेपथ्य आणि संगीताच्या सुंदर मिश्रणातून त्यांनी प्रेक्षकांना भावनिकरित्या गुंतवून ठेवले. त्यांच्या या अप्रतिम सादरीकरणामुळे त्यांना सांघिक तृतीय पारितोषिक मिळाले. स्पर्धेत चमकदार कामगिरी करत टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने पुन्हा एकदा आपल्या कलात्मकतेचा ठसा उमटवला आहे. त्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल संघाचे टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक व कुलगुरु डॉ. गीताली टिळक यांनी अभिनंदन करीत कौतुक केले.